theTAXtalk

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# नोंदणी व मुद्रांक विभाग

## नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालय

**तळमजला, नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवन समोर,पुणे ४११ ००१**

दुरध्वनि क्र.०२० -२६१२३८२६ ई-मेल :- **do5.igro@igrmaharashtra.gov.in**

जा.क्र. का.५/मुद्रांक -२४/स.क्र.३०७/२०२४/ ८२२ दिनांक- ३० /१०/२०२४.

प्रति,

१) मा.विभागीय आयुक्त (सर्व)
२) मा.जिल्हाधिकारी (सर्व)

विषय :- शासकीय कार्यालयात प्रतिज्ञापत्रासाठी स्टॅम्प पेपरची मागणी न करणेबाबत.

संदर्भ :- १) मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांचे जनहित याचिका क्रमांक ५८/२०२१ वरील न्यायालयीन आदेश.
२) महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभागाकडील अधिसूचना क्र.मुद्रांक २००४/१६६३/प्र.क्र४३६/म-१ दि.०१/०७/२००४.
३) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ७२ दि.१४/१०/२०२४.

उपरोक्त संदर्भ क्र.१ च्या आदेशान्वये जनहित याचिका ५८/२०२१ मध्ये मा.उच्च न्यायालय, छत्रपती संभाजीनगर खंडपीठ यांनी खालीलप्रमाणे सुचना केलेल्या आहेत.

All the Government authorities have to take effective steps to implement the notification and to make the authorities and the public aware. It is also the duty of the authorities to implement the notification in its true letter and spirit, so that unnecessary burden on the citizens would be avoided. Needless to state that, the exercise shall be done by the state government throughout the State of bringing it to the notice of all the Government departments and the authorities accepting affidavits and declaration not to insist upon the stamp duty.

संदर्भ क्र.२ अन्वये शासनाने शासकीय कार्यालयात जात / प्रमाणपत्र/ उत्पन्न प्रमाणपत्र / वास्तव्य प्रमाणपत्र / राष्ट्रीयत्वाचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी तसेच शासकीय कार्यालये यांचेसमोर दाखल

theTAXtalk

करावायाच्या इतर सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील अनुसूची-१ मधील अनुच्छेद-४ अन्वये आकारणी योग्य असलेले मुद्रांक शुल्क माफ केले आहे.

संदर्भ क्र.३ अन्वये महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाचे परिशिष्ठ - एक मधील अनुच्छेदामध्ये सुधारणा करण्यात आली असून अनुच्छेद क्रमांक ४, ५, ८, ९, २७, ३०, ३८, ४४, ५०, ५२, ५८ मध्ये रु.१००/- किंवा रु.२००/- ऐवजी रु.५००/- मुद्रांक शुल्क करण्यात आले आहे.

मा.उच्च न्यायालय, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचे संदर्भ क्र.१ चे आदेशानुसार शासकीय कार्यालयात प्रतिज्ञापत्र सादर करतांना नागरिकांकडून मुद्रांकाचा आग्रह करु नये असे स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच ई-सेवा केंद्रामध्ये नागरीकाकडून सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रासाठी रुपये १००/- चे स्टॅम्प पेपरची मागणी करीत असतात. दिनांक १४/१०/२०२४ चे शासन निर्णयानुसार ई-सेवा केंद्रामध्ये पक्षकाराकडून रुपये ५००/- चे स्टॅम्प पेपरची मागणी केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. शासकीय कार्यालय तसेच न्यायालयासमोर दाखल करण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रावर मुद्रांक शुल्क माफ केलेले असल्याने या संदर्भात आपल्या अधिपत्याखाली असलेले उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांना मार्गदर्शन करण्यात यावे.

30/10/24

हिरालाल सोनवणे (भा.प्र.से)
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य पुणे

सोबत - सहपत्रे

theTAXtalk

(1)



**IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY**
**BENCH AT AURANGABAD**

**PUBLIC INTEREST LITIGATION NO. 58 OF 2021**

Bhushan Ishwar Mahajan .. Petitioner

Versus

The State of Maharashtra and others .. Respondents

Ms. P. S. Talekar, Advocate h/f M/s. Talekar and Associates, for the Petitioner.
Mr. A. R. Kale, AGP for Respondent Nos. 1 to 4.

**CORAM : S. V. GANGAPURWALA &**
**R. N. LADDHA, JJ.**
**DATED : 11th October, 2021.**

**PER COURT**:-

. The present public interest litigation is filed seeking following reliefs :

A) To direct the respondents, their subordinates, officers, agents to strictly implement the notification dated 01.07.2004 issued by the Revenue and Forest Department, Mantralaya, Mumbai, wherein it is held by the State Government that the stamp duty chargeable under Article 4 of Schedule I of the Maharashtra Stamp Act, 1958 for the purposes of Affidavits to be used for any purposes has been remitted under Section 9 of the said Act, by issuing a writ of mandamus, or any other appropriate writ, order or direction as the case may be;

B) To direct the respondents their subordinates, officers, agents to display in their offices/public offices at conspicuous place that 'as per notification dated 01.07.2004 the stamp duty

Ak AK

theTAXtalk



chargeable under the Maharashtra Stamp Act, 1958 for the purposes of Affidavits to be used for any purposes has been remitted by issuing a writ of mandamus, or any other appropriate writ, order or direction as the case may be;

C) To direct the respondents to give wide publicity to the notification dated 01.07.2004 issued by the Revenue and Forest Department, Mantralaya, Mumbai, pending hearing and final disposal of this petition.

D) To direct the respondents, their subordinates, officers, agents not to insist any person to pay stamp duty under the Maharashtra Stamp Act, 1958 for the purposes of Affidavits to be used for any purposes, pending hearing and final disposal of this petition;

E) To grant any other relief to which the petitioner is entitled to.

2. Ms. Talekar, learned counsel for the petitioner submits that in spite of the fact that notification has been issued on 01.07.2004 by the State Government under Section 9 of the Maharashtra Stamp Act, 1958 (hereinafter referred to as 'Act of 1958') remitting the stamp duty chargeable under Article 4 of Schedule I of the Act of 1958 for the purpose of affidavit, the departments of the State Government are insisting for affidavits either on Rs. 100/- stamp paper or on Rs. 500/- stamp paper consistently. The same is in flagrant violation of the remission granted by the State Government. The departments of the State cannot insist for affidavit on a stamp paper.

theTAXtalk



3. The learned counsel for the petitioner to buttress her submissions relies on the tender documents of the Public Works Department to contend that now the Public Works Department is insisting for affidavit on Rs. 500/- stamp paper. The learned counsel also has referred to other illustrations to submit that in all Government departments, the affidavits are insisted on stamp papers.

4. Mr. Kale, learned A.G.P. submits that the State Government invoking its powers under Section 9 of the Act of 1958 has granted remission from payment of stamp duty on affidavits as envisaged under Article 4 of the Act of 1958. The State machinery has already instructed to all the Deputy Commissioners, District Collectors as well as all the authorities concerned informing issuance of resolution and instructed them for non insistence of the stamp papers. The authorities have also taken care to give wide publicity through posters as well as through news items. The steps are taken for public awareness of the issuance of notification granting remission of stamp duties for affidavits. The copies of news items and the relevant posters are also annexed with the affidavit in reply. The learned A.G.P. further submits that the Joint District Registrar, Aurangabad has filed affidavit that the authorities have also taken care to give wide publicity through poster as well as through news items and further granting remission of stamp duties for

theTAXtalk



the affidavits. The learned A.G.P. further submits that the notification granting remission of stamp duty for affidavit is also published on the Website.

5. The Act of 1958 is enacted to consolidate and amend the law relating to stamps and stamp duties in the State of Maharashtra. The same is adopted and modified by the Maharashtra Adaptation of Laws (State and Concurrent Subjects) Order, 1960. Article 4 of Schedule I of the Act of 1958 provides that affidavit that is to say, a statement in writing purporting to be a statement of facts, signed by the person making it and confirmed by him on oath or in the case of persons by law allowed to affirm or declare instead of swearing, by affirmation is required to be on a stamp paper of Rs. 100/-. Article 4 grants exemption to certain specific affidavits.

6. Section 9 of the Act of 1958 empowers the State Government to reduce or remit, whether prospectively or retrospectively, in the whole or any part of the State the duties with which any instruments or any particular class of instruments or any of the instruments belonging to such class, or any instruments when executed by or in favour of any particular class of persons, or by or in favour of any members of such class, are chargeable.

theTAXtalk



7. Invoking Section 9 of the Act of 1958, the State Government under notification dated 01.07.2004 remitted the stamp duty chargeable under Article 4 of schedule I appended to the said Act, on the instruments of affidavit or the declaration made for obtaining caste certificate/income certificate/domicile certificate/nationality certificate or for any other purpose of being filed or used before any Government authority or in any Court or before the officer of any Court.

8. The notification dated 01.07.2004 thereby remits the stamp duty on the instruments of affidavit or declaration for being used before any Government authority or in any Court or before the officer of any Court.

9. The notification is explicitly clear. No Government authority can insist for affidavit on a stamp paper. The Government, it appears was aware that its authorities are not abiding by the notification dated 01.07.2004 as such, issued a circular on 12.05.2015 directing not to insist for affidavits on stamp paper. It appears from the information provided under the Right to Information Act that Rs. 100/- stamps are used for non judicial purposes on a large scale.

10. It appears that Suo Moto Public Interest Litigation No. 121 of 2014 was registered at the Principal Seat of this Court on the basis of

theTAXtalk



the news item published in Mumbai Mirror on 10.07.2014, "Mystery Shortage of Rs. 100/- Stamp Papers". In the said Public Interest Litigation the affidavit was filed by the Additional Controller of Stamps. Paragraph No. 4 and 6 of the affidavit are reproduced by the Court in its judgment dated 28.03.2016 in Public Interest Litigation No. 121 of 2014. The same reads thus :

> 4] In the aforesaid affidavit, Additional Controller of Stamps has denied that there was any shortage of stamp papers of the denomination of Rs. 100 in the month of July 2014, or for that matter at present. Further, he has pointed out that the State in exercise of powers conferred upon it by clause (a) of section 9 of the Maharashtra Stamp Act, 1958 has issued notification dated 1 July 2014 remitting the stamp duty chargeable under section 4 of schedule I appended to the said Act, on the instruments of affidavit or declaration made for obtaining caste certificates, income certificates, domicile certificates and nationality certificates. As such, he has submitted that there is no necessity for purchase of any stamp paper for the aforesaid purpose. Mr. G. W. Mattos, the Government Pleader has submitted that in view of such notification, there are hardly any purposes, for which, the students seeking admission to educational institutions are required to purchase stamp papers.
>
> 5] That apart, the Additional Controller of Stamps at paragraphs 6, 7 and 8 of his affidavit has made the following statements :
>
> *"6. I say that the Government in the Revenue and Forest*

theTAXtalk



*Department vide a Circular dated 14th October, 2014 granted Stamp Vending licenses to Bar Associations for sale of Stamp Papers and Court Fee Labels in Court premises. I say that my office has issued Stamp Vending Licenses to the Dadar Bar Association, the Bombay Advocates Bar Association at the Small Causes Court, Mumbai, The Motor Accident Claim Tribunal Bar Association, The Borivali Advocates Bar Associations, the Advocates Associates of Western India, The Mazagaon Court Bar Association at Esplanade Court, Mumbai. However, the Advocates Association of Western India has not yet commenced the sale of Stamp Papers and Court Fee Labels inter alia on account of some administrative difficulties. I say that my office has also issued a Stamp Vending License to The Indian Advocates Multi State Multi Purpose Co-operative Society Ltd. situate in the High Court premises as per the permission granted by the Government in the Revenue and Forest Department vide its letter dated 26th November, 2014.*

*7. I say that it is made compulsory to fill the form in Annexure 1 for obtaining Stamp Papers for executing Affidavits and the form in Annexure 2 for executing documents other than Affidavits as per the Circular dated 14th August, 2014 issued by Inspector General of Registration, Maharashtra State, Pune. The specimen copies of the said Annexures are hereto annexed and marked as* ***EXHIBITS '2' and '3'*** *respectively. I say that for completing these formalities it takes some time, which some times results into long queues of people at the Stamp Vending Centres.*

theTAXtalk



*8. I say that in Mumbai and Mumbai Suburban District there are 24 Government approved license Stamp Vendors. I say that as per the demand of the said Stamp Vendors, supply of stamp papers and Court Fee labels is being arranged by my office regularly. Hence, there is no scarcity of stamp papers. I say that with a view to keep a check inter alia on the sale of stamp papers by Stamp Vendors, instructions are issued to all Collectors of Stamps in Mumbai and Mumbai Suburban District by my office to carry out periodic inspections of the licensed Stamp Vendors premises so as to inter alia ensure that the persons intending to purchase Stamp Papers are not overcharged."*

11. The said affidavit also clarified the stand of the State that remission on stamp paper for the affidavit is provided for.

12. The officers of the Government are required to be imparted with the necessary knowledge of the notification published by the State Government remitting the stamp duty. Though it is submitted that time to time news items are published, on the website also the same is published, still the fact remains that the affidavit on stamp papers are insisted upon by the Government Departments and also on the documents to be used before the Court.

13. The Government may take further steps such as holding workshops for the officers and the authorities and/or such steps so as to bring it to the notice of all concerned that they shall not insist for

theTAXtalk



affidavits on stamp paper. The notification has to be brought in effect in reality and the same shall not remain only on papers. The order dated 08.01.2015 issued by the State Election Commission also it seems is flouted. The State Election Commission on 08.01.2015 had issued an order that the affidavit and declaration shall not be insisted on the stamp paper, but still the same is accepted on stamp paper during the process of elections. All the Government authorities have to take effective steps to implement the notification and to make the authorities and the public aware. It is also the duty of the authorities to implement the notification in its true letter and spirit, so that unnecessary burden on the citizens would be avoided. Needless to state that, the exercise shall be done by the State Government throughout the State of bringing it to the notice of all the Government departments and the authorities accepting affidavits and declaration not to insist upon the stamp duty.

14. Public interest litigation is disposed of. No costs.

**( R. N. LADDHA )**
**JUDGE**

**( S. V. GANGAPURWALA )**
**JUDGE**

P.S.B.

theTAXtalk

(11)

असा. क्र. १५४ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

प्राधिकृत प्रकाशन

गुरुवार, जुलै १, २००४/आषाढ १०, शके १९२६

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-ब

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ जुलै २००४

### आदेश

**मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८.**

**क्रमांक मुद्रांक. २००४/१६३६/प्र. क्र. ४३६/म-१.**—मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा मुंबई ६०) याच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून लोकहितास्तव तसे करणे आवश्यक आहे अशी खात्री पटल्यामुळे महाराष्ट्र शासन याद्वारे जात प्रमाणपत्र/उत्पन्न प्रमाणपत्र/वास्तव्य प्रमाणपत्र/राष्ट्रीयत्वाचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी तसेच शासकीय कार्यालये व न्यायालये यांचेसमोर दाखल करावयाच्या इतर सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रावर, उक्त अधिनियमाच्या अनुसूची १ मधील अनुच्छेद ४ अन्वये आकारणीयोग्य असलेले मुद्रांक शुल्क माफ करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

भा. सु. तायडे,
शासनाचे अवर सचिव.



भाग चार-ब--१७५

[ किंमत—रुपये ३.०० ]

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 1st July 2004

### Order

BOMBAY STAMP ACT, 1958.

No. Mudrank. 2004/1636/C.R.-436/M-1.—In exercise of the powers conferred by clause (a) of section 9 of the Bombay Stamp Act, 1958 (Bom. LX of 1958), the Government of Maharashtra having satisfied that it is necessary to do so in the public interest, hereby remits the stamp duty chargeable under article 4 of the Schedule I appended to the said Act, on the instruments of affidavit or declaration made for obtaining Caste Certificate/Income Certificate/Domicile Certificate/Nationality Certificate or for any other purpose of being filed or used before any Government Authority or in any Court or before the officer of any Court.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

B. S. TAYADE,
Under Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

theTAXtalk

(13)

क्रमांक- संकिर्ण/२०१५/प्रशा-३/२/७०४
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन,
प्रशासकीय इमारत, ८ वा मजला,शासकीय वसाहत,
मुंबई उपनगर जिल्हा, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
दिनांक :- २९/९/२०१५

**परिपत्रक**

**विषय:- "शासकीय कार्यालये व न्यायालय यांच्या समोर दाखल करावयाच्या व इतर सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रावर असलेले मुद्रांक शुल्क माफ करणेबाबत"**

संदर्भ:- १) महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्रमांक:-मुद्रांक २०१५/प्र.क्र.१११/म-१, दिनांक:-१२ मे, २०१५.
२) नियोजन विभागाचे पत्र क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.२१८/का-१४२६, दिनांक :-०७ सप्टेंबर, २०१५.

महसूल व वन विभागाच्या उपरोक्त विषयांकित संदर्भ क्र.१ च्या परिपत्रकाची प्रत व महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग चार-ब अधिसुचना दि.०१/०७/२००४ माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीसाठी www.mahades.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ठेवण्यात आलेली आहे, त्याची नोंद घेण्यात येऊन योग्य ती कार्यवाही करावी.

(प्र.मो.पोहरे)
उप संचालक (प्रशासन),
अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
मुंबई.

प्रति,

१. मा.संचालक अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
२. अपर संचालक (सर्व), अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
३. सह संचालक (सर्व), /मुख्य संशोधन अधिकारी ,अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
४. सहसंचालक, प्रादेशिक कार्यालय, अर्थ व सांख्यिकी संचालनालय (सर्व).
५. उप संचालक(सर्व), / वरीष्ठ संशोधन अधिकारी,अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
६. जिल्हा सांख्यिकी अधिकारी, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, (सर्व)
७. शाखा प्रमुख, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई (सर्व).
शाखा प्रमुख यांना कळविण्यात येते की, सदरचे परिपत्रक शाखेतील सर्व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

d.प्रशासन-3/प्रतिज्ञा मुद्रांक/संकिर्ण८८

theTAXtalk

शासकीय कार्यालये व न्यायालय यांच्यासमोर दाखल करावयाच्या व इतर सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रावर असलेले मुद्रांक शुल्क माफ करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
शासन परिपत्रक क्रमांक-मुद्रांक २०१५/प्र.क्र.११९/म-१
दिनांक- १२ मे, २०१५

संदर्भ:- महसूल व वन विभाग शासन आदेश क्र. मुद्रांक-२००४/१६३६/प्र.क्र.४३६/म-१, दि.०१ जुलै,२००४.

## शासन परिपत्रक

शासनाने संदर्भाधिन आदेशान्वये जात प्रमाणपत्र/ उत्पन्न प्रमाणपत्र/ वास्तव्य प्रमाणपत्र/ राष्ट्रीयत्वाचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी तसेच शासकीय कार्यालये व न्यायालये यांचेसमोर दाखल करावयाच्या इतर सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रावर मुंबई मुद्रांक अधिनियमातील तरतूदीनुसार देय असलेले मुद्रांक शुल्क माफ केले आहे. आदेशाची प्रत नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे यांच्या www.igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. या आदेशांचे शासकीय कार्यालयांमधून व अधिका-यांकडून काटेकोरपणे पालन होणे अपेक्षित आहे.

सामान्य नागरिक/विद्यार्थी वर नमूद केलेल्या कारणांकरिता प्रतिज्ञापत्र दाखल करण्यासाठी जेव्हा शासकीय कार्यालयात जातो किंवा अधिका-यांकडे जातो तेव्हा त्यांचेकडून सदर प्रतिज्ञापत्र स्टँप पेपरवर करून आणण्याचा आग्रह धरला जातो, अशी बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. लोकहितास्तव शासनानें वरील प्रकारच्या प्रतिज्ञापत्रांवर मुद्रांक शुल्क माफ केलेले असल्याने, शासकीय अधिका-यांनी प्रतिज्ञापत्र स्टँप पेपरवर करून आणण्याची आग्रही भूमिका न घेता प्रतिज्ञापत्र सादर करून घेणे बंधनकारक आहे. तरी, मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिपत्यांखालील सर्व कार्यालये व अधिकारी/ कर्मचारी यांना सदर आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सुचना द्याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(श्री. श्यामसुंदर पाटील)
उपसचिव

ROTA/M 543(350-5-2015).

theTAXtalk



**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे. नवीन प्रशासकीय इमारत तळमजला, विधानभवनासमोर,पुणे-1.**

दुरध्वनी क्रमांक - 020 26123826 ई-मेल-do5.igro@igrmaharashtra.gov.in

---

क्र.का-5/पीआयएल-58/2021/510/21 दि. 16/11/2021

**प्रति,**

मा. विभागीय आयुक्त पुणे, नाशिक,
नागपुर, अमरावती, औरंगाबाद, कोकण.

**विषय** :- शासकीय कार्यालयात प्रतिज्ञापत्रासाठी स्टॅप पेपरची मागणी न करणेबाबत.

**संदर्भ** :- 1. मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांचे जनहित याचिका क्रमांक ५८/२०२१ वरील न्यायालयीन आदेश.

2. महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभागाकडील अधिसूचना क्र. मुद्रांक 2004/1663/प्र.क्र.436/म-1 दि. 01/07/2004

विषयांकित प्रकरणी संदर्भ क्र. 1 च्या आदेशान्वये जनहित याचिका 58/2021 मा. उच्च् न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी खालीलप्रमाणे सुचना केलेल्या आहेत.

All the Government authorities have to take effective steps to implement the notification and to make the authorities and the public aware. It is also the duty of the authorities to implement the notification in its true letter and spirit, so that unnecessary burden on the citizens would be avoided. Needless to state that, the exercise shall be done by the State Government throughout the State of bringing it to the notice of all the Government departments and the authorities accepting affidavits and declaration not to insist upon the stamp duty.

मा. उच्च् न्यायालय, औरंगाबाद खडपीठ यांच्या वरील आदेशानुसार शासकीय कार्यालयात प्रतिज्ञापत्र सादर करतांना नागरिकांकडुन मुद्रांक कागदाची मागणी करु नये. अर्थात मुद्रांक शुल्काची मागणी करु नये. संदर्भ क्रमांक 2 च्या शासन राजपत्रातील आदेशान्वये शासनाने शासकीय कार्यालये व न्यायालये यांचेसमोर दाखल करण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रावर मुद्रांक शुल्क माफ केलेले आहे. या

theTAXtalk

सदर्भात आपल्या अधिनस्त कार्यालयांना कळविण्यात यावे तसेच कार्यालय प्रमुखाच्या बैठकीत सदर विषय घेण्यात येवुन याबाबत विस्तृत प्रसिद्धी देण्यात यावी. ही विनंती

का.प.वर मा.नो.म.नि.यांची सही असे.

सोबत- 1. मा. उच्च न्यायालय औरंगाबाद यांचे PIL NO 58 OF 2021 मधील न्यायनिर्णयाची प्रत.

2. महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभागाकडील अधिसूचना क्र. मुद्रांक 2004/1663/प्र.क्र.436/म-1 दि. 01/07/2004

(स्वाक्षरी)

(......... तिवारी)

सह नोंदणी महानिरीक्षक तथा मुद्रांक अधिक्षक,

(मुख्यालय) म.रा.पुणे

theTAXtalk

(17)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# नोंदणी व मुद्रांक विभाग

**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालय**
**तळमजला, नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवन समोर,पुणे ४११ ००१**
दुरध्वनि क्र. ०२० - २६०५२४३२ ई-मेल :- do5.igro@maharashtra.gov.in

जा.क्र का.५/मुद्रांक -२४/सं.क्र.३००/२०२४/ ७९९ /२०२४ दिनांक- १६.१०.२०२४.

प्रति,

1) अपर मुद्रांक नियंत्रक,
2) सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,
3) सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी

**विषय :-** महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाचे परिशिष्ट एक मधील अनुच्छेदांमधील सुधारणाबाबत.

**संदर्भ — महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ७२ दि.**14/10/2024.

उपरोक्त संदर्भित विषयान्वये महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाचे परिशिष्ठ एक मधील अनुच्छेदामध्ये सुधारणा करण्यात आल्या असून त्या दि.१४/१०/२०२४ रोजीच्या राजपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने कळविण्यात येते की, सदरचे राजपत्र आपल्या माहितीस्तव पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव पाठविण्यात येत आहे.

सोबत- वरिलप्रमाणे

(उदयराज चव्हाण)
प्र.सह नोंदणी महानिरीक्षक तथा
मुद्रांक अधिक्षक (मुख्यलय) म.रा.

theTAXtalk

RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १०, अंक २०(३)] सोमवार, ऑक्टोबर १४, २०२४/आश्विन २२, शके १९४६ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ४७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२.**— महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. | १-४ |

**महसूल व वन विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १४ ऑक्टोबर २०२४.

MAHARASHTRA ORDINANCE No. XII OF 2024.

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA STAMP ACT.

**सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२.**

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

१९५८ चा ६०. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

theTAXtalk

(19)



**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :-

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) अध्यादेश, २०२४, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या अनुसूची एक ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमास जोडलेल्या अनुसूची एक मध्ये,— १९५८ चा ६०.

(१) अनुच्छेद ४ मध्ये, स्तंभ (२) मधील, "शंभर रुपये" या मजकुराऐवजी, "पाचशे रुपये" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) अनुच्छेद ५ मध्ये, खंड (ह) मधील, उप-खंड (ब) मध्ये, स्तंभ (२) मधील, "शंभर रुपये" या मजकुराऐवजी, "पाचशे रुपये" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(३) अनुच्छेद ८ मध्ये, स्तंभ (२) मधील, "शंभर रुपये" या मजकुराऐवजी, "पाचशे रुपये" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(४) अनुच्छेद ९ मध्ये, स्तंभ (२) मधील, "शंभर रुपये" या मजकुराऐवजी, "पाचशे रुपये" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(५) अनुच्छेद १० मध्ये, स्तंभ (२) मधील, "५०,००,००० रुपयांच्या कमाल मर्यादेच्या अधीनतेने, भाग भांडवलावर किंवा, यथास्थिती, वाढीव भाग भांडवलावर ०.२ टक्के " या मजकुराऐवजी, "एक कोटी रुपयांच्या कमाल मर्यादेच्या अधीनतेने, भाग भांडवलावर किंवा, यथास्थिती, वाढीव भाग भांडवलावर ०.३ टक्के " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(६) अनुच्छेद १२ ऐवजी, पुढील अनुच्छेद दाखल करण्यात येईल :—

" **१२. निवाडा,** म्हणजे, दावा चालू असताना, न्यायालयाच्या आदेशाव्यतिरिक्त अन्यथा केलेल्या निर्देशावर, विद्यमान किंवा भावी विवाद लवादाकडे सादर करण्या-विषयीच्या लेखी करारनाम्याच्या परिणामी दिलेला निवाडा असणारा, परंतु, वाटणीचा निदेश देणारा निवाडा नसणारा,—

| | |
|---|---|
| (अ) स्थावर मालमत्तेशी संबंधित असणारा ; | अनुच्छेद २५ च्या खंड (ब) अन्वये अभिहस्तांतरणपत्रावर जे आकारण्यायोग्य असेल तितके शुल्क. |
| (ब) (एक) जेव्हा, निवाड्यामध्ये दिलेली रक्कम, पन्नास लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल त्याबाबतीत; | निवाड्यामध्ये दिलेल्या रकमेच्या ०.७५ टक्के. |
| (दोन) जेव्हा, निवाड्यामध्ये दिलेली रक्कम, पन्नास लाख रुपयांपेक्षा अधिक असेल परंतु, पाच कोटी रुपयांपेक्षा अधिक नसेल त्याबाबतीत ; | रुपये सदतीस हजार पाचशे *अधिक* निवाड्यामध्ये दिलेल्या रकमेच्या ०.५ टक्के. |
| (तीन) जेव्हा, निवाड्यामध्ये दिलेली रक्कम, पाच कोटी रुपयांपेक्षा अधिक असेल त्याबाबतीत, | रुपये दोन लाख बासष्ट हजार पाचशे *अधिक* निवाड्यामध्ये दिलेल्या रकमेच्या ०.२५ टक्के."; |

जंगम मालमत्तेशी संबंधित असणारा, लवादाने किंवा पंचाने दिलेला कोणताही लेखी निर्णय, होय,

theTAXtalk



(७) अनुच्छेद २७ मध्ये, स्तंभ (२) मधील, " शंभर रुपयांच्या " या मजकुराऐवजी, "पाचशे रुपयांच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(८) अनुच्छेद ३० मध्ये, स्तंभ (२) मधील, " शंभर रुपये " या मजकुराऐवजी, "पाचशे रुपये" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(९) अनुच्छेद ३८ मध्ये, स्तंभ (२) मधील, " शंभर रुपये " या मजकुराऐवजी, "पाचशे रुपये" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(१०) अनुच्छेद ४४ मध्ये, स्तंभ (२) मधील, " शंभर रुपये " या मजकुराऐवजी, "पाचशे रुपये" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(११) अनुच्छेद ४७ मध्ये, खंड (१) मधील, उपखंड (ब) मध्ये, स्तंभ (२) मधील, " पंधरा हजार " या मजकुराऐवजी, " पन्नास हजार " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(१२) अनुच्छेद ४९ मध्ये, स्तंभ (२) मधील, " शंभर रुपये " या मजकुराऐवजी, "पाचशे रुपये" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(१३) अनुच्छेद ५० मध्ये, स्तंभ (२) मधील, " शंभर रुपये " या मजकुराऐवजी, "पाचशे रुपये" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(१४) अनुच्छेद ५२ मध्ये, खंड (अ) मधील, स्तंभ (२) मध्ये, " दोनशे रुपये " या मजकुराऐवजी, " पाचशे रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(१५) अनुच्छेद ५८ मध्ये, खंड (अ) मधील, स्तंभ (२) मध्ये, " दोनशे रुपये " या मजकुराऐवजी, " पाचशे रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(१६) अनुच्छेद ६३ मध्ये,—

(एक) खंड (अ) मधील, स्तंभ (१) मध्ये, " दहा लाख " या मजकुराऐवजी, "पाच लाख" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) खंड (ब) मधील,—

(क) स्तंभ (१) मध्ये, " दहा लाख " या मजकुराऐवजी, " पाच लाख " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) स्तंभ (२) मध्ये, " दहा लाख रुपयांवरील रकमेच्या ०.१ टक्के " या मजकुराऐवजी, " पाच लाख रुपयांवरील रकमेच्या ०.३ टक्के " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

theTAXtalk

(21)



## निवेदन

मुद्रांक शुल्क बसविण्यात सुलभता व एकरुपता आणण्याच्या आणि शासनाचा महसूल वाढविण्याच्या दृष्टीने, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०) यास जोडलेल्या अनुसूची एक च्या विवक्षित अनुच्छेदांमध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

२. उक्त अधिनियमातील प्रस्तावित सुधारणांची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :—

(एक) अनुच्छेद ४,५,८,९,२७,३०,३८,४४,४९,५०,५२, व ५८ यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या विवक्षित संलेखांवरील शंभर रुपये किंवा दोनशे रुपये इतक्या नाममात्र रकमेतील दीर्घ काळापूर्वी निश्चित केलेल्या मुद्रांक शुल्कांच्या दरात पाचशे रुपयेइतकी वाढ करणे ;

(दोन) अनुच्छेद १० मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कंपनी संस्थापन नियमावलीच्या संलेखावरील मुद्रांक शुल्काच्या दरात व मुद्रांक शुल्काच्या दराच्या कमाल मर्यादेत वाढ करणे ;

(तीन) अनुच्छेद १२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या लवादाने दिलेल्या निवाड्याच्या संलेखावरील मुद्रांक शुल्कांच्या दरात वाढ करणे ;

(चार) जेव्हा अनुच्छेद ४७ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रोख रकमेच्या स्वरुपात आणलेला अंशदानाचा हिस्सा, ५०,००० रुपयांहून अधिक असेल त्याबाबतीत, भागीदारीच्या संलेखावरील मुद्रांक शुल्कांच्या दराच्या कमाल मर्यादेत वाढ करणे ;

(पाच) अनुच्छेद ६३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कार्यकंत्राटाच्या संलेखावरील मुद्रांक शुल्काच्या दरात व मुद्रांक शुल्काच्या दराच्या कमाल मर्यादेत वाढ करणे.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम यात आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे, जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्याची खात्री पटली आहे, म्हणून हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक १४ ऑक्टोबर २०२४.

**सी. पी. राधाकृष्णन,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,
**राजेश कुमार,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

theTAXtalk

RNI No. MAHENG /2009/35528

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष १०, अंक २९ (३)] सोमवार, ऑक्टोबर १४, २०२४/आश्विन २२, शके १९४६ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २७.००

असाधारण क्रमांक ७२

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (*3*) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Stamp (Amendment) Ordinance, 2024 (Mah. Ord. XII of 2024), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATISH WAGHOLE,

Secretary (Legislation) to Government,
Law and Judiciary Department.

[Translation in English of the Maharashtra Stamp (Amendment) Ordinance, 2024 (Mah. Ord. XII of 2024), published under the authority of the Governor].

---

**REVENUE AND FORESTS DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 14th October 2024.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XII OF 2024.**

*AN ORDINANCE*

*further to amend the Maharashtra Stamp Act.*

WHEREAS, both Houses of the State Legislature are not in session;

AND, WHEREAS, the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Stamp Act, for the purposes hereinafter appearing; LX of 1958.

theTAXtalk

(23)



NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause (*1*) of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely :—

Short title and commencement.

**1.** (*1*) This Ordinance may be called the Maharashtra Stamp (Amendment) Ordinance, 2024.

(*2*) It shall come into force at once.

Amendment of SCHEDULE I of LX of 1958.

**2.** In SCHEDULE I appended to the Maharashtra Stamp Act,— LX of 1958.

(*1*) in article 4, in column (*2*), for the words "One hundred rupees" the words "Five hundred rupees" shall be substituted;

(*2*) in article 5, in clause (*h*), in sub-clause (*B*), in column (*2*), for the words "One hundred rupees" the words "Five hundred rupees" shall be substituted;

(*3*) in article 8, in column (*2*), for the words "One hundred rupees" the words "Five hundred rupees" shall be substituted;

(*4*) in article 9, in column (*2*), for the words "One hundred rupees" the words "Five hundred rupees" shall be substituted;

(*5*) in article 10, in column (*2*), for the figures, words and letters "0.2 per cent. on share capital or increased share capital, as the case may be, subject to a maximum of Rs. 50,00,000", the figures and words "0.3 per cent. on share capital or increased share capital, as the case may be, subject to a maximum of rupees One Crore" shall be substituted;

(*6*) for article 12, the following article shall be substituted, namely :—

| | |
|---|---|
| "12. AWARD, that is to say, any decision in writing by an arbitrator or umpire, on a reference made otherwise than by an order of the Court in the course of a suit, being an award made as a result of a written agreement to submit present or future differences to Arbitration but not being an award directing partition,— | |
| (*a*) relating to immovable property; | The same duty as is leviable on a conveyance under clause (*b*) of article 25. |

theTAXtalk



| | |
|---|---|
| *(b)* relating to movable property,— | |
| *(i)* where the amount granted in the award, does not exceed rupees fifty lakhs ; | 0.75 per cent. of the amount granted in the award. |
| *(ii)* where the amount granted in the award, exceeds rupees fifty lakhs but does not exceed rupees five crores; | Rupees thirty seven thousand five hundred plus 0.5 per cent. of the amount granted in the award. |
| *(iii)* where the amount granted in the award, exceeds rupees five crores; | Two lakhs sixty two thousand five hundred rupees plus 0.25 per cent. of the amount granted in the award. "; |

(*7*) in article 27, in column (*2*), for the words "rupees one hundred" the words "rupees five hundred" shall be substituted;

(*8*) in article 30, in column (*2*), for the words "One hundred rupees" the words "Five hundred rupees" shall be substituted;

(*9*) in article 38, in column (*2*), for the words "One hundred rupees" the words "Five hundred rupees" shall be substituted;

(*10*) in article 44, in column (*2*), for the words "One hundred rupees" the words "Five hundred rupees" shall be substituted;

(*11*) in article 47, in clause (*1*), in sub-clause (*b*), in column *(2)*, for the words "fifteen thousand" the words "fifty thousand" shall be substituted;

(*12*) in article 49, in column (*2*), for the words "One hundred rupees" the words "Five hundred rupees" shall be substituted;

(*13*) in article 50, in column (*2*), for the words "One hundred rupees" the words "Five hundred rupees" shall be substituted;

(*14*) in article 52, in clause (*a*), in column (*2*), for the words "Two hundred rupees" the words "Five hundred rupees" shall be substituted;

(*15*) in article 58, in clause (*a*), in column (*2*), for the words "Two hundred rupees" the words "Five hundred rupees" shall be substituted;

(*16*) in article 63,—

*(i)* in clause *(a)*, in column (*1*), for the words "ten lakh" the words "five lakh" shall be substituted;

*(ii)* in clause *(b)*,—

(*A*) in column (*1*), for the words "ten lakh" the words "five lakh" shall be substituted;

(*B*) in column (*2*), for the figures and words "0.1 per cent. of the amount above rupees ten lakh" the figures and words "0.3 per cent. of the amount above rupees five lakh" shall be substituted.

theTAXtalk

(25)



STATEMENT

With a view to bring simplicity and uniformity in levy of stamp duty and to increase the Government revenue, it is proposed to amend certain articles of Schedule I appended to the Maharashtra Stamp Act (LX of 1958).

2. The salient features of the proposed amendments to the said Act are as under :—

(*i*) to increase rate of stamp duty fixed long ago at the nominal amount of rupees hundred or rupees two hundred on certain instruments specified in articles 4, 5, 8, 9, 27, 30, 38, 44, 49, 50, 52 and 58 to rupees five hundred;

(*ii*) to increase rate of stamp duty and maximum limit of rate of stamp duty on the instrument of articles of association of a company specified in article 10;

(*iii*) to increase rate of stamp duty on the instrument of award by arbitrator specified in article 12;

(*iv*) to increase the maximum limit of rate of stamp duty on the instrument of partnership, where share contribution brought in by way of cash is in excess of rupees 50,000, specified in article 47;

(*v*) to increase the rate of stamp duty and maximum limit of rate of stamp duty on the instrument of works contract specified in article 63.

3. As both Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exists which render it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Stamp Act, for the purposes aforesaid, this Ordinance is promulgated.

Mumbai,
Dated the 14th October 2024.

C. P. RADHAKRISHNAN,
Governor of Maharashtra.

By order and in the name of the
Governor of Maharashtra,

RAJESH KUMAR,
Additional Chief Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.